दि. १०/१०/२०२१.

सभेची सूचना

प्रति,

मा. ------------------------------------

------------------------------------

------------------------------------

महोदय,

प्रा. डॉ. एन.डी. पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर - पेरीड ची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षातील संघाच्या कार्यकारिणीची पहिली सभा शनिवार दि. १६ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ९:३० वाजता माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मा. सर्जेराव बंडू पाटील यांचे अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. एन.डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर-पेरीड येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी आपण सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

सचिव
प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय,
माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

अध्यक्ष
प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय,
माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

सभेपुढील विषय

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. महाविद्यालयाच्या नॉक पूर्व तयारी बाबतच्या कामकाजाची माहिती घेणे.

३. माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाचे महाविद्यालयाच्या नॉक तयारीबाबत कशा स्वरूपात योगदान असावे याबाबत चर्चा करणे.

४. महाविद्यालयाच्या नॉक प्रक्रिये दिवशी माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ सदस्यांच्या पिअर टीम सोबतच्या मिटिंग साठी उपस्थिती बाबत चर्चा करणे.

४. मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे.

Scanned with CamScanner

दि.१६/१०/२०२१

# सभेची उपस्थिती

प्रा. डॉ. एन. डी. पाटील ~~माजी~~ महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पहीली सभा शनिवार दि. १६/१०/२०२१ रोजी सकाळी ९:३० वाजता महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाचे अध्यक्ष मा. सर्जेराव बंडू पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1.) मा. श्री. सर्जेराव बंडू पाटील (अध्यक्ष)

2) मा. श्री. नितीन कोठावळे (उपअध्यक्ष)

③ मा. श्री. भरत यशवंत पाटील

④ मा. श्री. सुहास सुरेश पाटील

⑤ मा. श्री. उत्तम बळवंत पाटील

⑥ मा. श्री. प्रकाश यशवंत खोत

7 श्री. अभय शेखर भिंगार्डे

दि. १६/१०/२०२१.

# सभेचे इतिवृत्त

प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर- पेरीड ची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पहीली सभा महाविद्यालयामध्ये शनिवार दि. १६/१०/२०२१ रोजी सकाळी ९:30 वाजता संघाचे अध्यक्ष मा. श्री. सर्जेराव बंडू पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेमध्ये पुढील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली व सर्वानुमते विषयपत्रिकेनुसार ठराव मंजूर करण्यात आले.

विषय क्र.१ - मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करून मंजूरी घेणे.

ठराव :- माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाचे सचिव यांनी मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सूचक :- श्री. भरत यशवंत पाटील.
अनुमोदक :- श्री. सुहास सुरेश पाटील.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. 2 - महाविद्यालयाच्या नॅक पुर्वतयारी बाबतच्या कामकाजाची माहिती घेणे.

ठराव :-

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल हेळकर सभेस निमंत्रीत सदस्य म्हणून उपस्थित होते. वरील विषयास अनुसरून त्यांनी सविस्तर माहिती उपस्थित सदस्यांना दिली.

सूचक :- श्री. प्रकाश यशवंत खोत
अनुमोदक :- श्री. उत्तम बळवंत पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. 3 - माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाचे महाविद्यालयाच्या नॅक तयारीबाबत कशा स्वरूपात योगदान असावे, याबाबत चर्चा करणे.

ठराव :- नॅकच्या अनुषंगाने माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाचा सहभाग म्हणून माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाकडे जमा असलेल्या

Scanned with CamScanner

i) महाविद्यालयात शिकत असणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, बस प्रवास खर्च व वैद्यकिय सुविधा यासाठी काही रक्कम राखीव करून त्याचा विनीयोग करावा.

सुचक :- श्री. उत्तम बळवंत पाटील.

अनुमोदक :- श्री. सुहास सुरेश पाटील.

ii) उपलब्ध निधीपैकी रू. ३००००/- ची स्पर्धा परीक्षा पुस्तके व कपाट खरेदी करण्यात यावे. सदर स्वतंत्र्य कपाट स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये ठेवून आजी व माजी विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करावी. एका शिर्षकाची किमान चार पुस्तके खरेदी करण्यात यावी. माजी विद्यार्थ्यांना पुस्तके वाचनास देण्यासाठी आचरसंहिता महाविद्यालयाने तयार करावी.

सुचक - श्री. सुहास सुरेश पाटील

अनुमोदक - श्री. उत्तम बळवंत पाटील.

iii) उर्वरीत रक्कमेचा काही भाग वापरून महाविद्यालयाच्या Botanical Garden मध्ये 1000/- लिटर क्षमतेची सिमेंटची पाण्यासाठी टाकी बांधण्यात यावी, ज्यातील पाण्याचा वापर Botanical Garden मधील झाडांना पाणी देण्यासाठी करावा. सदर टाकीवर माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाचा नामोल्लेख करण्यात यावा.

सुचक - श्री. सुहास सुरेश पाटील

अनुमोदक - श्री. प्रकाश यशवंत खोत.

iv) भविष्यामध्ये माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या अंतर्गत रस्त्यांवर लाईटचे लोखंडी खांब उभारावेत व त्यासाठी जमीनीखालुन विजवाहीनी टाकण्यात यावी.

सुचक - श्री. भरत यशवंत पाटील

अनुमोदक - श्री. उत्तम बळवंत पाटील.

विषय क्र. ४ - महाविद्यालयाच्या नॅक प्रक्रिये दिवशी माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ सदस्यांच्या पिअर टिम सोबतच्या मिटींगसाठी उपस्थिती बाबत चर्चा करणे.

ठराव - महाविद्यालयास नॅक पिअर टिम दि. १६ व १७ नोव्हेंबर २०२१ रोजी भेट देणार आहे. सदर भेटीवेळी टिम माजी विद्यार्थ्यां-

सोबत संवाद साधते. या संवादासाठी संघाच्या सर्व सदस्यांनी उपस्थित राहण्याचा प्रयत्न करावा. तसेच आपल्या संपर्कातील इतर माजी विद्यार्थ्यांना उपस्थित राहणेबाबत आग्रह करावा. महाविद्यालयातील प्रत्येक विभागाने आपल्या विभागातील जास्तीत जास्त माजी विद्यार्थी उपस्थित राहतील असे नियोजन करावे. तसेच माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाची एक बैठक दि. ५ नोव्हेंबर २०२१ पूर्वी आयोजीत करावी.

सुचक - प्रकाश यशवंत खोत

विषय क्र

अनुमोदक - भरत यशवंत पाटील.

विषय क्र. ५ - मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने ऐनवेळेच्या विषयावर चर्चा करणे.

ठराव - ऐनवेळेच्या विषयांमध्ये खालील विषयांवर चर्चा करून ठराव संमत करण्यात आले.

i) नॅक प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भव्य असा माजी विद्यार्थी मेळावा आयोजीत करण्यात यावा. या मेळाव्याचे नियोजन किमान दोन महीने अगोदर पासून करावे. या कार्यक्रमापूर्वी वेगणी पुस्तीकांची छपाई करून घेण्यात यावी.

ii) महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी विविध ठिकाणी कार्यरत आहेत. त्यांना अनुषांगिक कार्यक्रमांसाठी साधन व्यक्ती, प्रमुख पाहुणे म्हणुन आमंत्रीत करण्यात यावे. ज्या मान्यवरांना online स्वरूपात मार्गदर्शन करणे शक्य आहे त्यांना Online मार्गदर्शन कार्यक्रमामध्ये सहभागी करून घ्यावे.

iii) महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती माजी विद्यार्थी व समाजातील विविध घटकांना होणेसाठी महाविद्यालयाच्या नावे Facebook Page सुरु करण्यात यावे. त्यावर महाविद्यालयातील विविध उपक्रम व समारंभांची माहिती प्रसिद्ध करावी.

iv) माजी विद्यार्थी सदस्यता फी रु. २००/- आहे ती तशीच ठेवावी. त्यामध्ये कोणतीही वाढ करण्यात येवू नये.

सुचक - श्री. उत्तम बळवंत पाटील

अनुमोदक - श्री. प्रकाश यशवंत खोत.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने मा. सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानले व सभा संपन्न झाल्याचे जाहिर केले.

[सही]
सचिव
प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय,
माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

(शिक्का: प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड • नों. क्र. कोल्हापूर/०००२९८/२०१९)

[सही]
अध्यक्ष
प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय,
माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

Scanned with CamScanner

# कार्यवाही अहवाल

i) स्पर्धा परीक्षा विभागासाठी रु. ३०,३४५ ची एकूण ११४ पुस्तके खरेदी करण्यात आली. सदर पुस्तके स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख डॉ. सत्यवान बनसोडे यांच्या ताब्यात देण्यात आली आहेत. ही पुस्तके विभागामार्फत आजी- माजी विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करण्यात येतील.

ii) उर्वरीत रक्कम खर्च करण्यासंबंधी देण्यात आलेल्या सूचनेनुसार आर्थिक मदतीसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागणी करण्यात आली आहे. मा. अध्यक्षांच्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

iii) नॅक पिअर टिमच्या सदस्यांच्यासोबत बैठकीचे नियोजन करण्यासाठी दि. १९/११/२०२४ रोजी सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

iv) आजी- माजी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची माहिती देणेसाठी मा. प्राचार्य यांच्या फेसबुक अकौंटवरुन महाविद्यालयाच्या नावे नवीन पेज तयार करण्यात आले.

Scanned with CamScanner

# सभेची सूचना

दि. ०७/११/२०२१

प्रति,

मा. ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

महोदय,

प्रा. डॉ. एन.डी. पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर - पेरीड ची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षातील संघाच्या कार्यकारिणीची दुसरी सभा गुरू वार दि. ११ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ०९:३० वाजता माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मा. सर्जेराव बंडू पाटील यांचे अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर-पेरीड येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी आपण सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

**सचिव**
**प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय,**
**माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड**
**ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर**

प्रा. डॉ. एन.डी. पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड
नों. क्र. कोल्हापूर/ ००००२९८/ २०१९

**अध्यक्ष**
**प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय,**
**माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड**
**ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर**

सभेपुढील विषय

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. महाविद्यालयाच्या नॅक पूर्व तयारी बाबतच्या कामकाजाची माहिती घेणे.

३. महाविद्यालयाच्या नॅक प्रक्रिये दिवशी माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ सदस्यांच्या पिअर टीम सोबतच्या मिटिंग साठी उपस्थिती बाबत चर्चा करणे.

४. मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे.

Scanned with CamScanner

# सभेची उपस्थिती

प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील दुसरी सभा शुक्रवार दि. ११।११।२०२१ रोजी सकाळी ९:३० वाजता महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी कल्याणकारि संघाचे अध्यक्ष मा. सर्जेराव बंडू पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. श्री. सर्जेराव बंडू पाटील -(अध्यक्ष)
2. मा. श्री. नितीन कोळावळे - (उपाध्यक्ष)
3. अमेय शेखर भिंगार्डे.
4. भारत राऊ पाटील
5. भरत यशवंत पाटील
6. शिवाजी तुकाराम पाटील
7. श्री. प्रकाश यशवंत खोत

Scanned with CamScanner

सभेचे इतिवृत्त

प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड ची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील दुसरी सभा गुरुवार दि. ११।११।२०२१ रोजी सकाळी ९:३० वाजता महाविद्यालया-मध्ये पार पडली. या सभेचे अध्यक्ष मा. श्री. सर्जेराव पाटील हे होते. या सभेमध्ये पुढील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली आणि सर्वानुमते विषयपत्रिकेनुसार ठराव मंजूर करण्यात आले.

विषय क्र.१ - मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करून मंजूरी देणे.

ठराव-

माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाचे सचिव यांनी मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सूचक- भरत यशवंत पाटील.

अनुमोदक- प्रकाश यशवंत खोत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.२- महाविद्यालयाच्या नॅक पूर्वतयारी बाबतच्या कामकाजाची माहिती देणे.

ठराव -

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल हेळकर सभेस निमंत्रीत सदस्य म्हणून उपस्थित होते. वरील विषयास अनुसरून त्यांनी सविस्तर माहिती सदस्यांना दिली.

सूचक - अजय शेखर भिंगार्डे.

अनुमोदक- शिवाजी तुकाराम पाटील.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र.३ – महाविद्यालयाच्या नॅक प्रक्रिये दिवशी माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ सदस्यांच्या पिअर टिम सोबतच्या मिटींगसाठी उपस्थिती बाबत चर्चा करणे.

ठराव-

महाविद्यालयाच्या नॅक प्रक्रिये दिवशी माजी विद्यार्थी कल्याणकारी संघाच्या सर्व सदस्यांनी पिअर टिम सोबतच्या मिटींगसाठी उपस्थित राहणे आवश्यक असून सर्वांनी वेळेत उपस्थित रहावे.

सूचक - श्री. सर्जेराव बंडू पाटील.

Scanned with CamScanner

विषय क्र. ४ - मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने ऐनवेळेच्या विषयावर चर्चा करणे.

ठराव -

ऐनवेळेच्या विषयांमध्ये कोणत्याही विषयावर चर्चा झाली नाही.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने मा. सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानले व सभा संपन्न झाल्याचे जाहिर केले.

सचिव
प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय,
माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय • माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड
नों. क्र. कोल्हापूर/००००२१८/२०१९

अध्यक्ष
प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय,
माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ, मलकापूर-पेरीड
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

Scanned with CamScanner

प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी कल्याणकारी संघ,

चेकचे जावक रजिस्टर

| अ. न. | कोणाचे नावे चेक काढला | तपशील | रक्कम रुपये | पै. | चेक नं. | तारीख | लेखनिकाची सही. | सचिव सही | अध्यक्ष सही. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Nokari Sandarbh Book Shoppee. | Books for Competitive Examination Cell. | 30,345 | 00 | 115181 | 1/11/2021 | [signature] | [signature] | [signature] | |

Scanned with CamScanner